**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशेन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक
(सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587



# दैनिक आकर्षण

संपादक : विजय सांगळे

वर्ष ५ । अंक ३११ । शनिवार १२ सप्टेंबर २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322







# भगवान महावीरांचे अहिंसेचे तत्वज्ञान मनमनात रूजावे - अमृता फडणवीस

## आनंद तीर्थ समवशरण येथील समर्पण चातुर्मास कार्यक्रमास उपस्थिती




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या पावन भूमीत सध्या समर्पण चातुर्मास सुरू असून पर्युषण पर्व अनुष्ठाना यातीलविविध धार्मिक कार्यक्रमांना नगरसह देशभरातून आलेले भाविक हजेरी लावत आहेत. शनिवारी सकाळी दिव्याज फाउंडेशनच्या ट्रस्टी अमृता देवेंद्र फडणवीस यांनी आनंद तीर्थ समवशरण येथे उपस्थित राहून या आध्यात्मिक पर्वणीचा लाभ घेतला.

यावेळी महाराष्ट्र प्रवर्तक पूज्य कुंदनऋषीजी महाराज, उपाध्याय प्रवर पूज्य प्रविणऋषीजी महाराज, पूज्य आलोकऋषीजी महाराज, पूज्य तिर्थेशऋषीजी महाराज, पूज्य सत्यप्रभाजी म.सा., पूज्य अमितज्योतीजी म.सा. आदी साधू साध्वीजींसह आ. संग्राम जगताप,

सौ. धनश्री सुजय विखे पाटील, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, समर्पण चातुर्मासाचे मुख्य लाभार्थी मुंबईचे प्रसिद्ध उद्योगपती आणि अहिल्यानगरचे सुपुत्र तथा तिरूपती बालाजी देवस्थानचे विश्वस्त सौरभ हेमराज बोरा, प्रमिलाताई हेमराज बोरा, सौ. राखी सौरभ बोरा, पराग बोरा व परिवारातील ■ पान ४ वर



## गणेशोत्सवानिमित्त शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिरात विविध कार्यक्रम

### सोमवारी जिल्हा पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या हस्ते 'श्रीं'ची प्राणप्रतिष्ठापणा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहराचे ग्रामदैवत असलेल्या माळीवाडा येथील श्री विशाल गणेश मंदिर येथे गणेशोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. श्री गणेश चतुर्थी दिनी दि.१४ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ९.३० वा. मंदिरात जिल्हा पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या हस्ते 'श्रीं'ची विधीवतपणे प्राणप्रतिष्ठापणा होईल. याचबरोबर १२ दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती देवस्थानचे अध्यक्ष अ‍ॅड.अभय आगरकर यांनी दिली.

सोमवार दि.१४ सप्टेंबर रोजी पहाटे महापुजा, प्राणप्रतिष्ठेच्यावेळी सकाळी ९ वा. 'रुद्रवंश' ढोल पथकाची ■ पान ४ वर


श्री केशरचंद गुलाबचंद मुनोत नेवासकर सार्वजनिक ट्रस्ट संचलित

**केजी कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स**

महाराष्ट्र शासन व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मान्यता प्राप्त महाविद्यालय

पंडित नेहरू हिंदी विद्यालय परिसर एलआयसी जवळ किल्लयासमोर अहिल्यानगर महाराष्ट्र
आय एस ओ १४००१- २००१५ व नॅक मान्यताप्राप्त. संपर्क. ०२४१ -२३२६९६०
E-mail : Kg.college@yahoo.com I www : kgcolleg.in

**शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी प्रवेश सुरू**

**पदवी अभ्यासक्रम**

- **बीए**
- **बीकॉम** (टॅलीसह) (प्रमुख विषय - बँकिंग अँड फायनान्स, कॉस्ट अँड वर्क अकाउंटिंग, मार्केटिंग, बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन)
- **बीकॉम** कंप्यूटर एप्लीकेशन (पूर्वीचे बीसीए अभ्यासक्रम)
- **बीबीए** बिझनेस मॅनेजमेंट (पूर्वीचे बीबीए)

२०२५-२०२६ मध्ये नवीन शैक्षणिक धोरणानुसार यशस्वी अभ्यासक्रमाची निर्मिती अंतर्गत विद्यापीठीय अभ्यासक्रमाबरोबरच जीवनात यशस्वी करणारे अभ्यासक्रम.

- पत्रकारिता
- उद्योजकता विकास
- टॅली
- ऑफिस ॲडमिनिस्ट्रेशन आणि ऑफिस ऑटोमेशन.
- ट्रॅव्हल अँड टुरिझम अभ्यासक्रम

- आचार्य चाणक्य कौशल्य विकास योजनेअंतर्गत शहरातील विद्यार्थ्यांना फ्रंट लाईन कम्युनिकेशन व रिसेप्शनिस्ट अभ्यासक्रम.
- सॉफ्ट स्किल • पायथॉन
- शहरातील ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत संगणक ज्ञानावर आधारित अभ्यासक्रम.

महाविद्यालयाची वैशिष्ट्ये

• महात्मा गांधी राष्ट्रीय परिषद ग्रामीण व उच्च शिक्षण भारत शिक्षण मंत्रालयाचे राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त महाविद्यालय • अद्ययावत संगणक लॅब • डिजिटल क्लासरूम व हॉल • उद्योजकांची प्रत्यक्ष संवाद. • विद्यार्थी कल्याण उपक्रम • सुसज्ज ग्रंथालय • निसर्गरम्य परिसर

संपर्क 9420752291, 9763641011, 9850136654


# जमीन नसल्याने खडकवाडी सोसायटीतील सभासदत्व रद्द

## सहाय्यक निबंधकांचा आदेश; नंतर बक्षीसपत्राने जमीन मिळाल्याचा दावा ठरला अपुरा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** खडकवाडी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., खडकवाडी येथील श्री. शरद भाऊसाहेब गागरे यांचे सभासदत्व रद्द करण्याचा आदेश सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पारनेर यांनी दिला आहे. सभासदत्व मिळण्याच्या पात्रतेसाठी आवश्यक जमीन त्यांच्या नावावर नसल्याचे निष्पन्न झाल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.

याबाबत श्री. सखाराम शंकर नवले यांनी सहाय्यक निबंधकांकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. संस्थेच्या उपविधीनुसार सभासद होण्यासाठी संबंधित व्यक्ती संस्थेच्या कार्यक्षेत्रातील खातेदार व रहिवासी असण्याबरोबरच किमान १० आर जमीन धारण करणारी असणे आवश्यक असल्याचा आक्षेप तक्रारीत घेण्यात आला होता.

सुनावणीदरम्यान सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांची तपासणी करताना तक्रार अर्ज दाखल करण्यात आला त्या दिवशी श्री. शरद भाऊसाहेब गागरे यांच्या नावावर संस्थेच्या कार्यक्षेत्रात जमीन नसल्याचे सहाय्यक निबंधकांच्या निदर्शनास आले. त्यामुळे सभासदत्वासाठी आवश्यक पात्रता त्यांनी पूर्ण केली नसल्याचा निष्कर्ष काढण्यात आला. दरम्यान, सुनावणीमध्ये गट नं. ३४४ मध्ये ०.२२ हे.आर. जमीन त्यांच्या नावावर असल्याचे कागदपत्र सादर करण्यात आले. मात्र सदर जमीन बक्षीसपत्राद्वारे नंतर त्यांच्या नावावर झाल्याचे आदेशात नमूद आहे. ■ पान ४ वर


**Schedule for Against CAP Admission (ACAP) for A.Y. 2026-27**

**Samajbhushan Eknathrao Dhakane College of Engineering, Shevgaon**

| Sr. No. | Available Courses (B.Tech) | Choice Code | Available Seats for ACAP | |
|---|---|---|---|---|
| | | | FY | DSE |
| 1 | Civil Engineering | 0537019110 | 30 | 00 |
| 2 | Computer Engineering | 0537024510 | 48 | 03 |
| 3 | Electrical Engineering | 0537029310 | 10 | 05 |
| 4 | Mechanical Engineering | 0537061210 | 17 | 01 |
| 5 | Artificial Intelligence & Data Science | 0537099510 | 51 | 09 |

**Sunitatai Eknathrao Dhakane College of Management, Shevgaon**

| Sr. No. | Available Courses | Choice Code | Available Seats for ACAP |
|---|---|---|---|
| 1 | Master in Business Administration (M.B.A) | 0564410110 | 84 |
| 2 | Master in Computer Applications (M.C.A) | 0564424210 | 31 |

**Schedule for Admission through Against CAP (ACAP) Vacancy**

| Activity | FY and DSE (B.Tech) | FY MBA & FY MCA |
|---|---|---|
| Display of Vacant Seats at www.kgvp.co.in | 08/09/2026 | 08/09/2026 |
| Invite Applications from registered candidates (Online & Offline) | 08/09/2026 to 11/09/2026 | 08/09/2026 to 11/09/2026 |
| Display of Provisional Merit List for registered candidates | 11/09/2026 @ 05.00 pm | 11/09/2026 @ 05.00 pm |
| Display of Final Merit List for registered candidates | 11/09/2026 @ 08.00 pm | 11/09/2026 @ 08.00 pm |
| Reporting to Institute for admission confirmation | 12/09/2026 to 14/09/2026 | 12/09/2026 to 14/09/2026 |
| Cut-off date for admission | 15/09/2026 | 15/09/2026 |

IMPORTANT NOTE: As per policy decision by GoM and respective department NO SCHOLARSHIP benefit will be available for the students admitted against ACAP vacancies.

Contact for Enquiries
Website: www.kgvp.co.in
Email: sedhakanecoe@gmail.com, sedhakanecom@gmail.com
Contact: 9890281628, 7798555999, 98607 40886, 98347 04384, 832 922 5147, 88568 52178, 80092 00985, 70307 00802

Address: Dhakane Educational Campus, Gat No. 147/2, At/Po-Rakshi, Tal- Shevgaon, Dist.- Ahilyanagar 414502



**कोणत्याही प्रकारचे कर्ज आता त्वरीत मिळवा!**

गरजेला नक्कीच मदत आमची, उभे राहण्याची हिंमत तुमची !

**राघव लोन सर्व्हिसेस**

व्यावसायिक कर्ज 75 लाखांपर्यंत (विनातारण)

**सर्व प्रकारच्या कर्ज सुविधा**

जुन्या जेसीबी,ट्रॅक्टर, हायवा,कार, इ. साठीही कर्ज पुरवठा

▪ जलद मंजुरी ▪ कमी व्याजदर ▪ सुलभ हफ्ते





**विनातारण कर्ज**
- व्यवसायीक व पगारदारांसाठी खास सी.सी / ओ.डी सुविधा
- डॉक्टर लोन
- आकर्षक व्याजदर

**तारण कर्ज**
- घर,एन.ए प्लॉट,व्यवसायिक मालमत्ता यासाठी कर्ज सुविधा
- आर.झोन,गुंठेवारी,ग्रामपंचायत हद्दीतील मालमत्ता यावरही त्वरीत कर्ज

**वाहन कर्ज**
- नविन व जुन्या कारसाठी कमीत कमी व्याजदरात त्वरीत कर्ज
- व्यावसायिक वाहनांसाठी शासकीय अनुदान

विनातारण व्यावसायिक कर्जासाठी आवश्यक कागदपत्रे : पॅन कार्ड, आधार कार्ड, शॉप अ‍ॅक्ट, उद्यम आधार, मागील तीन वर्षांचे आयटीआर, बँक अकाऊंट स्टेटमेंट (पीडीएफ मध्ये), जीएसटी सर्टिफिकेट, लाईट बिल, फोटो

सर्व प्रकारच्या व्यवसायासाठी शासकीय कर्ज योजनांचे ऑनलाईन फॉर्म भरुन मिळतील तसेच कर्जासाठी योग्य मार्गदर्शन केले जाईल

अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ | मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम | ओ.बी.सी. महामंडळ योजना

(टीप - या योजनांसाठी सेवाशुल्क आकारले जाईल)

नियम व अटी लागू

700+ सिबिल स्कोअर 700+ असल्यास प्राधान्य

कोणतेही चालू कर्ज थकीत नसावे

आम्ही संपुर्ण महाराष्ट्रात कर्ज सेवा देतो

नामांकीत बँका व एनबीएफसी चे अर्थसहाय्य उपलब्ध !

**अधिक माहितीसाठी संपर्क : 9960283285**

पत्ता : शॉप नंबर 29,स्टेट बँके समोर,सुरजनगर,शिरुर,ता.शिरुर

## दै. आकर्षण निवडक

### स्वतःचा निकामी झालेला हात घेऊन चिमुकला पोहोचला जिल्हाधिकारी कार्यालयात



अहिल्यानगर - पाथर्डी तालुक्यातील करंजी-भोसे रोड परिसरातील एका हॉस्पिटलमध्ये उपचार घेतल्यानंतर अवघ्या नऊ वर्षांच्या चिमुकल्याच्या उजव्या हातावर कायमस्वरूपी परिणाम झाल्याचा गंभीर आरोप त्याच्या पालकांनी केला आहे. उपचारादरम्यान झालेल्या कथित निष्काळजीपणामुळे मुलाच्या हातातील रक्तवाहिन्यांना इजा होऊन हाताचा पंजा व बोटांची हालचाल प्रभावित झाल्याचा दावा पालकांनी केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई)च्या वतीने करण्यात आली. विशेष म्हणजे, आपल्या मुलावर झालेल्या अन्यायाची व्यथा प्रशासनासमोर मांडण्यासाठी पालकांनी स्वतःचा हात निकामी झालेल्या नऊ वर्षांच्या मुलालाच जिल्हाधिकारी कार्यालयात आणले. चिमुकल्याची अवस्था पाहून उपस्थितांचेही लक्ष वेधले गेले. पालकांनी दिलेल्या निवेदनानुसार, ८ ऑगस्ट २०२६ रोजी जोहिर गायकवाड हा खेळताना/पडल्याने त्याच्या उजव्या हाताला गंभीर दुखापत झाली. तपासणी केल्यानंतर हाताचे हाड फ्रॅक्चर झाल्याचे निदान झाले. त्यानंतर संबंधित हॉस्पिटलमध्ये त्याच्यावर प्लास्टर करण्यात आले. मात्र, प्लास्टरनंतर मुलाच्या हातात तीव्र वेदना सुरू झाल्या आणि हाताची स्थिती बिघडत गेल्याचे पालकांचे म्हणणे आहे. मुलाला पुन्हा संबंधित डॉक्टरांकडे नेण्यात आले. त्यावेळी प्लास्टर काढण्यात आले. प्लास्टर काढण्यासाठी बराच वेळ लागला आणि त्यानंतर हातातून रक्तस्राव झाल्याचे पालकांनी निवेदनात म्हटले आहे. हातातील रक्तवाहिन्यांना इजा झाल्यामुळे रक्तपुरवठ्यावर परिणाम झाला आणि त्यानंतर गंभीर संसर्गाची परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोपही करण्यात आला आहे. मुलाची प्रकृती चिंताजनक झाल्यानंतर त्याला अहिल्यानगर येथील शासकीय रुग्णालयात नेण्यात आले. तेथून पुढील उपचारासाठी पुण्यातील रुग्णालयात जाण्याचा सल्ला देण्यात आला. मात्र, कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्याने पुढील उपचारासाठी अहिल्यानगर शहरातील एका खासगी रुग्णालयात मुलाला दाखल करण्यात आले. तेथे तपासणी केल्यानंतर आणखी विलंब झाला असता हात कापण्याची वेळ आली असती, अशी माहिती डॉक्टरांनी दिल्याचा दावा पालकांनी केला आहे. त्यानंतर मुलावर शस्त्रक्रिया करण्यात आली. पुढील काळात त्याच्यावर प्लास्टिक सर्जरीही करण्यात आली. उपचार करूनही हातातील नसा व पंजाच्या हालचालींवर कायमस्वरूपी परिणाम झाल्याचे पालकांचे म्हणणे आहे. या प्रकरणी संबंधितांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी, तसेच दोष सिद्ध झाल्यास संबंधितांची वैद्यकीय नोंदणी/परवाना याबाबत नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. कारवाई न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. यावेळी चे शहर जिल्हा कार्याध्यक्ष दानिश शेख, शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के, विजय शिरसाठ, गुलाम अली शेख, प्रतीक बारसे यांच्यासह पीडित मुलाचे पालक उपस्थित होते.

### गणेशोत्सवात कर्णकर्कश डीजेला लगाम; पारंपरिक ढोल-ताशांना परवानगी

अहिल्यानगर - महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा जपणारा सार्वजनिक गणेशोत्सव हा भक्ती, श्रद्धा, संस्कृती आणि सामाजिक ऐक्याचा उत्सव आहे. मात्र गणेशोत्सवाच्या काळात मोठ्या आवाजातील डीजे व कर्णकर्कश ध्वनिक्षेपकांमुळे होणाऱ्या ध्वनीप्रदूषणाला आळा घालावा आणि पारंपरिक ढोल-ताशा व ढोल पथकांना शासनाच्या नियमानुसार परवानगी द्यावी, अशी मागणी भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती मोर्चाचे शहर जिल्हा उपाध्यक्ष साहेबराव शंकरराव काते यांनी केली आहे. याबाबत त्यांनी पोलीस अधीक्षक, पोलीस उपअधीक्षक व जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले. गणेशोत्सवाच्या काळात वाढणाऱ्या ध्वनीप्रदूषणामुळे ज्येष्ठ नागरिक, रुग्ण, विद्यार्थी, लहान मुले तसेच सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागते. त्यामुळे सार्वजनिक गणेशोत्सवादरम्यान कर्णकर्कश आवाजातील डीजे व ध्वनीप्रदूषण करणाऱ्या साउंड सिस्टिमला परवानगी देऊ नये, अशी मागणी काते यांनी निवेदनातून केली आहे.

# श्री संत सेना महाराज पुण्यतिथी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा

**अभिषेक, भजन-पूजा, भव्य शोभायात्रा, ढोलपथक व महाप्रसादाने उत्सवाला भक्तिमय स्वरूप**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सकल नाभिक समाज, अहिल्यानगर यांच्या वतीने श्री संत शिरोमणी सेना महाराज यांचा पुण्यतिथी सोहळा मंगळवार, दि. ८ सप्टेंबर २०२६ रोजी विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांनी मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. सकाळी नगरकर नाभिक पंचाचा वाडा येथे संत सेना महाराजांच्या मूर्तीवर विधिवत अभिषेक करण्यात आला.भजन, पूजन व आरतीने परिसर भक्तिमय झाला. भाविकांनी मोठ्या श्रद्धेने संत सेना महाराजांचे दर्शन घेतले. धार्मिक कार्यक्रमानंतर सकाळी ९ वाजता पालखी व भव्य शोभायात्रेला प्रारंभ झाला.

नगरकर नाभिक पंचाचा वाडा येथून सुरू झालेली शोभायात्रा पानसरे गल्ली, अर्बन बँक चौक, नवी पेठ, नेता सुभाष चौक, लक्ष्मी कारंजा मार्गे गायत्री मंदिर, महाजन गल्ली येथे पोहोचली. शोभायात्रेत टाळकरी मंडळी, हिंदवी शौर्य ढोलपथक, विविध वाद्यपथक तसेच वारकरी समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ढोलपथकाच्या गजराने आणि टाळ-मृदंगाच्या भक्तिमय निनादाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. संत सेना महाराजांच्या जयघोषात निघालेल्या या शोभायात्रेमुळे शहरातील वातावरण भक्तिमय झाले होते.

शोभायात्रेत नाभिक समाजातील महिला, पुरुष, युवक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेले टाळकरी व वारकरी, ढोलपथकाचे आकर्षक सादरीकरण आणि पालखीचे दर्शन घेण्यासाठी मार्गावर जमलेले भाविक यामुळे शोभायात्रेला विशेष आकर्षण प्राप्त झाले. अनेक ठिकाणी नागरिकांनी पालखीचे स्वागत करून संत सेना महाराजांचे दर्शन घेतले.



शोभायात्रेनंतर गायत्री मंदिर, महाजन गल्ली येथे मान्यवरांच्या उपस्थितीत मुख्य कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अहिल्यानगर चे आ.संग्राम जगताप होते. यावेळी महापौर सौ. ज्योतीताई गाडे, उपमहापौर श्री.धनंजय जाधव, स्थायी समिती सभापती श्री. सुभाषभाऊ लोंढे, दै.दिव्य मराठीचे ब्युरो चीफ श्री. नितीन पोटलशेरू, पत्रकार श्री.बाळ बोठे स्नेहदीप हॉस्पिटलचे डॉ. प्रदीप इंगळे, नगरसेविका सौ.आशाताई डागवाले, सौ.सुनिता गेनापा, सौ.मयुरी जाधव, नगरसेवक श्री.सागर मुर्तुडकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी संत सेना महाराजांच्या विचारांचे स्मरण करून त्यांच्या कार्याला अभिवादन करण्यात आले. समाजातील एकोपा, संतपरंपरेचे जतन आणि पुढील पिढीपर्यंत संतांचे विचार पोहोचविण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. संत सेना महाराजांनी समाजाला दिलेला सेवाभाव, भक्ती आणि कर्तव्याचा संदेश आजही प्रेरणादायी असल्याचे मान्यवरांनी सांगितले.

या उत्सवासाठी बाळासाहेब भुजबळ, माऊली गायकवाड, संदीप शिंदे, बापू औटी, आशिष ताकपिरे, बबन काशीद, सागर शेळके, सुशील थोरात, आर. के. साळुंखे, संतोष यादव, शुभम राऊत, संदीप राऊत, संपत मदने, दादा मदने, सुधाकर काशीद, बाबुराव ताकपिरे, लालू काशीद, संतोष जाधव, सौरभ शिंदे यांच्यासह सकल नाभिक समाजातील कार्यकर्ते व मान्यवरांनी परिश्रम घेतले.

उत्सवाच्या निमित्ताने नाभिक समाजातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून संत सेना महाराजांच्या पालखीचे दर्शन घेतले. समाजातील विविध घटकांच्या सहभागामुळे यंदाचा पुण्यतिथी सोहळा अधिक भव्य व उत्साहपूर्ण ठरला. धार्मिक कार्यक्रमाबरोबरच समाजातील एकोपा आणि बंधुभावाचे दर्शन या उत्सवातून घडून आले. मुख्य कार्यक्रमानंतर गायत्री मंदिर, महाजन गल्ली येथे भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. मोठ्या संख्येने उपस्थित भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन सकल नाभिक समाज, अहिल्यानगर यांच्या वतीने करण्यात आले होते. उत्सव यशस्वी करण्यासाठी समाजबांधव, कार्यकर्ते, टाळकरी, वारकरी, विद्यार्थी व नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

**महिलांनीच केले पार्थिव शिवलिंग पूजन**

## महापौर ज्योती गाडे यांच्या हस्ते महाआरती



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** विश्व मांगल्यच्या वतीने पार्थिव शिवलिंग पूजनाचा धार्मिक उपक्रम भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. विशेष म्हणजे या पूजेचे पौरोहित्य महिलांनीच केले. पारंपरिक धार्मिक विधींमध्ये महिलांचा वाढता सहभाग अधोरेखित करणारा हा उपक्रम ठरला.

यावेळी सौ. स्वाती पवळे, सौ. स्वाती सिरसूळ, सौ. सुरेखा जंगम, सौ. लीला अग्रवाल, सौ. कालिंदी केसकर आणि सौ. मयुरी जाधव यांनी पार्थिव शिवलिंगाची विधिवत पूजा-अर्चा केली. सौ. रेखा झंवर यांच्या मार्गदर्शनाखाली पूजेचे धार्मिक विधी श्रद्धा आणि भक्तिभावाने पार पडले.

महापौर सौ. ज्योती गाडे यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. महाआरतीच्या वेळी उपस्थित भाविकांनी हर हर महादेवचा जयघोष करत भक्तिभावाने सहभाग घेतला. महिलांनीच पौरोहित्याची जबाबदारी स्वीकारल्याने उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक केले.या प्रसंगी श्री सिद्धेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष दिलीप पांढरे यांची उपस्थिती होती. पूजन व महाआरतीनंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. भाविकांनी मोठ्या श्रद्धेने महाप्रसादाचा लाभ घेतला.महिलांच्या सहभागातून धार्मिक परंपरा, संस्कार आणि महिला सक्षमीकरणाचा सुंदर संगम घडवून आणणारा हा उपक्रम भक्तिमय वातावरणात उत्साहात पार पडला.

## सनातन धर्मसभेच्यावतीने १५ रोजी ऋषितुल्य व्यक्तीमत्वांचा सन्मान होणार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सुमारे १२५ वर्षांची पवित्र परंपरा असलेल्या सनातन धर्मसभेच्यावतीने ऋषिपंचमीच्या दिवशी विविध क्षेत्रातील ऋषितुल्य कार्य करणार्या नागरिकांचा यथायोग्य सन्मान करण्यात आला. यामध्ये यावर्षी वेदमूर्ती सुधाकर जोशी, वेदमूर्ती बंडोपंत मुळे, वेदमूर्ती पांडुरंग मुळे, त्याचप्रमाणे दत्तात्रय भालेराव, योगेश परदेशी, सौ. अर्चना गावडे, अशोक कुरापटी, अतुल डावरे मधुकर क्षीरसागर, संजय पारनाईक, अशोकराव करंदीकर आदींचा समावेश आहे. हा कार्यक्रम येत्या मंगळवारी (दि. १५) होत आहे, अशी माहिती धर्मसभेचे कार्याध्यक्ष वेदमूर्ती दत्तोपंत पाठक यांनी दिली.

ऋषितुल्य कार्य करणार्या नागरिकांचा यथायोग्य सन्मान सनातन धर्मसभेच्यावतीने सन १९०७ पासून केला जात असल्याची माहिती धर्मसभेचे कार्याध्यक्ष वेदमूर्ती दत्तोपंत पाठक यांनी दिली. सनातन धर्मसभा संस्थेचे अध्यक्ष वेदमूर्ती घनपाठी महेश रेखे यांच्या हस्ते ऋषितुल्य व्यक्तींचा हा सन्मान करण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे उपाध्यक्ष निळकंठ देशमुख व डॉ. नंदकुमार मुळे यांनी दिली.

महाजन गल्ली येथील संस्थेच्या ज्ञानेश्वर सभागृह येथे सायंकाळी ६ वाजता या ऋषितुल्यांचा सत्कार होणार आहे. या कार्यक्रमास संस्थेचे सर्व सभासद, समाजातील सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेचे मंत्री दिनकर देशमुख, रमेश देशपांडे, निलेश धर्माधिकारी, खजिनदार उमेश नगरकर, वेदमूर्ती उमेश वाळुंजकर यांच्या सर्व पदाधिकारी यांनी केले आहे.

## जनता विद्यालयात पर्यावरणपूरक गणपती निर्मिती कार्यशाळा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** पर्यावरण प्रदूषणामुळे निसर्गाचा होणारा ऱ्हास टाळण्यासाठी जनता विद्यालय रुईछत्तीशी ता. नगर या विद्यालयात भावी पिढीमध्ये पर्यावरण संवर्धनाचा विचार रुजावा, जनजागृती व्हावी तसेच पर्यावरण पूरक गणेशोत्सव साजरा करण्याचा संदेश मिळावा या उद्देशाने पर्यावरण पूरक गणपती निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेसाठी ज्येष्ठ चित्रकार, शिल्पकार व कलाशिक्षक श्री नंदकुमार यन्नम यांनी विद्यार्थ्यांना शाडू-माती पासून गणेश मूर्ती तयार करण्याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. देशभरामध्ये साजरा होणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव काळामध्ये पर्यावरण पूरक शाडू- माती पासून बनवलेल्या गणपती मूर्तींची निर्मिती करून त्यांची स्थापना केल्यास जलप्रदूषण मोठ्या प्रमाणात कमी होऊन पर्यावरणाचे रक्षण साधता येईल असे प्रतिपादन विद्यालयाचे प्राचार्य श्री दत्ता पाटील नारळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले.

या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभागी होऊन १७० गणेश मूर्तींची निर्मिती केली व त्याच मूर्तींची स्थापना यंदाच्या गणेशोत्सवात करून पर्यावरण संवर्धन करण्याचा निर्धार केला. विद्यालयातील शिक्षक व शिक्षिकेंनीही या कार्यशाळेत सहभाग नोंदवला. सौ सुनंदा राशिनकर श्रीम. उल्का गुंड, सौ.स्वाती हरिश्चंद्रे यांनीही आकर्षक गणपती मूर्तींची निर्मिती केली

या कार्यशाळेसाठी पर्यवेक्षिका सौ तारा पाडळकर, कलाशिक्षिका सौ शारदा पाटील, सौ अर्चना कोहक, श्री संभाजी जगदाळे, श्री सचिन काळे यांनी परिश्रम घेतले.

## चिमुकल्या हातांनी घडला बाप्पा, सर्जनशीलतेचा उमटला ठसा!

**सेंट विवेकानंद इंग्लिश प्रायमरी स्कूलमध्ये गणपती बनवा कार्यशाळा उत्साहात**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सेंट विवेकानंद इंग्लिश प्रायमरी स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्या सर्जनशीलतेला चालना मिळावी तसेच पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावा, या उद्देशाने 'गणपती बनवा कार्यशाळेचे' आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या चिमुकल्या हातांनी मातीपासून सुंदर गणेशमूर्ती साकारल्या.

हा उपक्रम प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. कांचन पापडेजा यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला.

मुख्याध्यापिका म्हणाल्या की, एनईपी २०२० चे उद्दिष्ट शिक्षणाला घोकंपट्टीतून सर्वांगीण, अनुभवात्मक आणि क्षमता-आधारित शिक्षणात रूपांतरित करून, ज्ञानी, कुशल, नैतिक आणि जबाबदार नागरिकांची जोपासना करणे आहे. अभ्यासासोबतच, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासाचाही विचार करण्यात आला आहे. चित्रकला शिक्षिका अनामिका म्हस्के व क्रीडा शिक्षिका सौ. नयन तुपे यांनी कार्यशाळेच्या आयोजनात मोलाची भूमिका बजावत विद्यार्थ्यांना आवश्यक सहकार्य व मार्गदर्शन केले.

कार्यशाळेसाठी प्रसिद्ध शिल्पकलाकार प्रेरणा बागरेचा यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. त्यांनी जी. डी. आर्ट शिल्पकला या विषयातील पदविका पूर्ण केली असून, हा भारतातील पारंपरिक कला पदविका अभ्यासक्रम आहे. या अभ्यासक्रमामध्ये शिल्पकला, चित्रकला व ललित कलांवर विशेष भर दिला जातो. त्यांनी ही पदविका भारती विद्यापीठाच्या भारती कला महाविद्यालयातून (कॉलेज ऑफ फाईन आर्ट्स) प्राप्त केली आहे.

शिल्पकलाकार प्रेरणा बागरेचा यांनी विद्यार्थ्यांना मातीपासून गणेशमूर्ती घडविण्याची प्रक्रिया प्रात्यक्षिकासह समजावून सांगितली. मातीला योग्य आकार देणे, मूर्तीची रचना करणे तसेच कलात्मक बारकावे याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनीही अत्यंत उत्साहाने सहभाग घेत आपल्या कल्पकतेतून विविध सुंदर गणेशमूर्ती साकारल्या. 'कलेतून संस्कार आणि संस्कारातून पर्यावरण संवर्धन' असा सुंदर संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

या उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष श्री. राम मेंघानी, उपाध्यक्ष श्री. रूपचंद मोटवानी, सचिव श्री. गोपाल भागवानी, खजिनदार श्री. दामोधर माखिजा, विश्वस्त श्री. महेश मध्यान, श्री. सुरेश हिरानंदानी, श्री. राजकुमार गुरुनानी व श्री. हरेष मध्यान, तसेच माध्यमिक विभागाच्या प्राचार्या सौ. गीता तांबे आणि प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. कांचन पापडेजा यांनी कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या कलाकृतींचे विशेष अभिनंदन करत सर्वांना गणेशोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद, हातातील माती आणि त्यातून साकारलेला बाप्पा यामुळे संपूर्ण वातावरण भक्तिमय व कलामय झाले.

## रामकृष्ण अर्बन क्रेडिट सोसायटीची वार्षिक सभा

**४ कोटी ३३ लाखांचा विक्रमी निव्वळ नफा, १५ % टक्के लाभांश जाहीर**




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** परमपूज्य डोंगरे महाराज यांच्या आशीर्वादाने व कै. काकासाहेब धूत यांच्या प्रेरणेने स्थापन झालेल्या श्री रामकृष्ण अर्बन सहकारी क्रेडिट सोसायटी ने ४२ व्या वर्षात पदार्पण केले आहे. संस्थेचा ताळेबंद मांडताना मनस्वी आनंद होत आहे. अहवाल सालात नूतन वर्षानिमित्त एक जानेवारी २०२६ ला दहा टक्के इतक्या आकर्षक व्याजदराची १११ दिवस मुदतीची स्पेशल डिपॉझिट स्कीम सुरू केली आणि केवळ १९ दिवसातच संस्थेचे शंभर कोटीचे उद्दिष्ट पूर्ण झाले आहे.या योजनेला ठेवीदारानी उत्तम प्रतिसाद दिला आहे.त्यामुळे "एक विश्वास एक बांधिलकी" हे संस्थेचे ब्रीदवाक्य सार्थ ठरले आहे. असे चेअरमन किसनलाल बंग यांनी संगितले.

अध्यक्षीय भाषणात संस्थेची आर्थिक माहिती विशद करताना बंग म्हणाले की,
आज अखेर १२४ कोटी ठेवी आहेत. कर्जवाटप ८७ कोटी आहे. एकूण गुंतवणूक ९२ कोटी आहे . सोनेतारण कर्ज ६२ कोटी इतके आहे. सोनेतारण कर्ज ही सुरक्षित असल्याने ही संस्थेची जमेची बाजू आहे. संस्थेच्या सावेडी शाखेला बारा वर्षे पूर्ण होत आहे. अहवाल सालात सावेडी शाखेच्या नफ्यात लक्षणीय वाढ झालेली आहे.सावेडी परिसरातील सर्व सभासद, खातेदार यांचा उदंड प्रतिसाद मिळत असल्याने शाखा उत्तरोत्तर प्रगती करत आहे.

तसेच गतवर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील सभासदांच्या सूचनेनुसार मुख्य शाखेचे सुशोभीकरण करून नवीन फर्निचर सहित संपूर्ण ऑफिस वातानुकूलित करण्यात आले आहे.ऑक्टोंबर २०२५ मध्ये महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशन यांच्या वतीने पतसंस्था चळवळीत दिशादर्शक कार्याबद्दल मानाचा "दीपस्तंभ" पुरस्कार देऊन गोकर्ण महाबळेश्वर येथे पार पडलेल्या दिमाखदार सोहळ्यात संस्थेला गौरविण्यात आले.

नेहमीप्रमाणे याही वर्षी संस्थेने १५% लाभांश जाहीर केला आहे.संस्थेस ऑडिट "अ" वर्ग मिळालेला आहे. नेट एनपीए शून्य टक्के आहे. संस्थेचे कामकाज सुरळीत व प्रगतीपथावर चालण्यासाठी संस्थेचे संस्थापक चेअरमन श्रीगोपाल धूत यांचे बहूमोल मार्गदर्शन लाभत असते. तसेच व्हाईस चेअरमन राजेंद्र मालू व सर्व संचालक व संचालिका यांचे वेळोवेळी सहकार्य मिळत आहे.तसेच संस्थेचे सेवक वर्ग आत्मियतेने संस्थेचे कामकाज करीत आहेत. रामकृष्ण क्रेडिट अर्बन चे सभासद खातेदार,ठेवीदार व हितचिंतक आणि सर्व तत्कालीन व विद्यमान संचालक यांनी दाखविलेल्या विश्वासामुळे संस्था प्रगतीपथावर आहे.असे प्रतिपादन श्री रामकृष्ण अर्बन क्रेडिट सहकारी सोसायटीचे चेअरमन किसनलाल बंग यांनी केले आहे.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### कोतकर कुटुंबातील सदस्य चि. उदयनराजे व कु. श्रुतिका कोतकर उच्च शिक्षणासाठी लंडन येथे रवाना



अहिल्यानगर - केडगाव येथील उद्योजक भानुदासजी कोतकर यांचे नातू तसेच संदीप उद्योग समूहाचे संचालक व माजी महापौर संदीपदादा कोतकर यांचे चिरंजीव उदयनराजे आणि कन्या श्रुतिका हे पुढील उच्च शिक्षणासाठी लंडन येथे नुकतेच रवाना झाले आहेत. चि. उदयनराजे व कु. श्रुतिका यांना लंडन येथे रवाना होण्यासाठी मुंबई येथून विमान होते. यावेळी विमानतळावर त्यांना निरोप देण्यासाठी कोतकर परिवारातील सर्व सदस्य उपस्थित होते. यावेळी त्यांना कोतकर परिवार तसेच हितचिंतकांच्यावतीने भावी यशासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

### विजय शंकर महादेव मंदिरात श्रावण (भंडारा) महाप्रसाद चे वाटप



अहिल्यानगर - पोस्ट ऑफिससमोर असलेल्या श्री विजय शंकर महादेव मंदिर येथे बुधवार, दि. ९ सप्टेंबर २०२६ रोजी भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. दुपारी १ ते ४ वाजेपर्यंत हा भंडारा आयोजित करण्यात आला होता. श्रावण मासानिमित्त मंदिरात आकर्षक विद्युत रोषणाई व फुलांची सजावट, प्रवेशद्वारावर आकर्षक रांगोळी, भजन गायन व लघु रुद्राभिषेक, महा अभिषेक आणि महाआरती झाली. पुजारी राजेंद्र राजमाने यांनी महा अभिषेक केला. अहिल्यानगर, माळीवाडा, नालेगाव, कापड बाजार, भिंगार, केडगाव सावेडी परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने दर्शन व महाप्रसादाचा लाभ घेतला.कार्यक्रम यशस्वीतेसाठी - श्री विजय शंकर महादेव भक्त सेवा मंडळ.

### निमगाव वाघा येथे बैलपोळा उत्साहात साजरा

अहिल्यानगर- नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथे श्रावणी बैलपोळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शेतकऱ्यांचे कामधेनू असलेल्या बैलांना आकर्षक सजवून गावातून पारंपरिक वाद्यांच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली. ढोल-ताशे, लेझीम आणि साऊंड सिस्टमसह गुलाल व भंडाऱ्याच्या उधळणीने वातावरण रंगून गेले होते. बैलांना सजवून मिरवणुकीत सहभागी झालेल्या शेतकऱ्यांचे बिरोबा मंदिर येथे स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था व श्री नवनाथ युवा मंडळाच्या वतीने डोंगरे संस्थेचे अध्यक्ष व ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. यावेळी डोंगरे संस्थेचे अध्यक्ष व ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे, अनिल डोंगरे, विजय जाधव, बाबुराव जाधव, सुभाष जाधव, अतुल फलके, गोकुळ जाधव, डॉ. विजय जाधव, अजय ठाणगे, सागर कापसे, एकनाथ जाधव, पिंटू जाधव, प्रशांत जाधव, बाबा जाधव, नामदेव जाधव, अजय जाधव, गुलाब जाधव आदी उपस्थित होते. मिरवणुकीदरम्यान शेतकऱ्यांनी सजवलेल्या बैलांना मारुती, नवनाथ व बिरोबा मंदिरात दर्शनासाठी नेले. प्रत्येक मंदिरात बैलांची पूजा करून शेतकऱ्यांनी आपल्या कामधेनू प्रती कृतज्ञता व्यक्त केली. गावात या मिरवणुकीमुळे सजवलेल्या बैलांची जणू जत्राच भरली होती. अनिल डोंगरे यांनी उपस्थित शेतकरी व ग्रामस्थांना शुभेच्छा दिल्या.

---

**यशवंतराव चव्हाण स्मृती समिती अंबाजोगाई दरवर्षी दिला जाणारा**

# स्व. भगवानराव लोमटे स्मृती राज्य पुरस्कार ख्यातनाम कवी व साहित्यिक प्राचार्य डॉ. विठ्ठल वाघ यांना जाहीर



**अंबाजोगाई –** यशवंतराव चव्हाण स्मृती समितीचा स्व. भगवानरावजी लोमटे स्मृती राज्य पुरस्कार यावर्षी ज्येष्ठ कवी व साहित्यिक प्राचार्य डॉ. विठ्ठल वाघ यांना घोषित करण्यात आला आहे अशी माहिती समितीचे सचिव दगडू लोमटे यांनी दिली आहे.

यशवंतराव चव्हाण स्मृती समितीच्या वतीने दरवर्षी आंबेजोगाई येथील राजकारणी, समाजकारण, साहित्य, संस्कृती, संगीत,शिक्षण आदी क्षेत्रात उतुंग कार्य केलेले स्व. भगवानरावजी लोमटे यांच्या स्मृतिपित्यर्थ दरवर्षी साहित्य, संगीत, पत्रकारिता, सुसंस्कृत राजकारणी, क्रीडा, सिनेमा – नाट्य, शिक्षण आदी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या एका मान्यवरास हा पुरस्कार स्वर्गीय भगवानराव लोमटे यांच्या स्मृती प्रित्यर्थ दिला जातो यावर्षी हा १४ वा पुरस्कार सुप्रसिद्ध ज्येष्ठ कवी प्राचार्य डॉ. विठ्ठल वाघ यांना दिला जाणार आहे.

मराठी साहित्यविश्वात ग्रामीण जीवनाचे वास्तव, मातीचा सुगंध, शेतकऱ्याच्या घामाची कहाणी, श्रमजीवी माणसाचे दुःख आणि आनंद, तसेच वऱ्हाडी बोलीची अस्सल गोडी आपल्या साहित्यातून प्रभावीपणे व्यक्त करणारे बहुआयामी व्यक्तिमत्त्व म्हणून ते परिचित आहेत. लेखक, कादंबरीकार, नाटककार, संशोधक, कोशकार, चित्रकार, काव्यगायक आणि सामाजिक भान असलेले संवेदनशील व्यक्तिमत्त्व त्यांचे आहे. त्यांच्या साहित्याने मराठी ग्रामीण साहित्याला एक वेगळी ओळख आणि नवा आयाम प्राप्त करून दिला आहे. त्यांच्या प्रसिद्ध ''काया मातीत मातीत'' या काव्यसंग्रहातील शीर्षकातूनच त्यांच्या काव्यविश्वाचे स्वरूप स्पष्ट होते. त्यांनी इंदौर येथे एम. ए. मराठी शिक्षण घेतले व संत गाडगे बाबा विद्यापीठ नागपूर येथून ''पारंपरिक वऱ्हाडी म्हणींचा सर्वांगीण अभ्यास'' याविषयात पी.एच.डी. प्राप्त झाली.

कपाशीची चंद्रफुले, पाऊसपाणी, गावशिव, पंढरीच्या वाटेवर, काया मातीत मातीत, वैदर्भी, साय, वृषभसूक्त, मातीचा झरतो डोळा, मायबाप हे कविता संग्रह प्रसिद्ध आहेत. डेबू व डेबूजी प्रमुख कादंबऱ्या आहेत. चित्रपट गीत लेखन, पटकथा लेखन, अंधारयात्रा हे नाटक खूप गाजले होते. पहाडी आवाजात कविता सादर करणारे कवी म्हणून रसिकांना ते आवडतात.

त्यांचा जन्म हिंगणी ता. तेल्हारा जिल्हा अकोला येथे झाला. निवृत्ती नंतर सध्या ते पुण्यात वास्तव्य करतात. त्यांचा यशवंतराव चव्हाण स्मृती समारोहात सुरुवाती पासून सहभाग राहिला आहे. भगवानराव लोमटे व त्यांची मैत्री सर्वश्रुत आहे. विठ्ठल वाघ यांनी महाराष्ट्रभर कवितेचे कार्यक्रम करून भाषा वृध्दी व प्रसाराचे कार्य केले आहे. या कार्याची दखल घेऊन यावर्षीचा पुरस्कार त्यांना प्रदान करण्याचा निर्णय समितीने घेतला आहे. पुरस्काराचे स्वरुप स्मृती चिन्ह, सन्मानपत्र, शाल, पुष्पहार, रोख पंचवीस हजार रुपये असे आहे. यापूर्वी हा पुरस्कार, यशवंतराव गडाख पाटील, विजय कुवळेकर, पद्मश्री ना. धों. महानोर, रामदास फुटाणे, पं. नाथराव नेरळकर, विजय कोलते, मधुकर भावे, उल्हास दादा पवार, प्राचार्य रा. रं. बोराडे व पद्मश्री डॉ. यु. म. पठाण, प्रा. भास्कर चंदनशिव, पद्मश्री डॉ. सतीश आळेकर व डॉ. वासुदेव मुलाटे यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले.

या वर्षीचा चौदावा पुरस्कार कवी डॉ. विठ्ठल वाघ यांना रविवार दिनांक २० सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ठिक ५ वाजता आद्यकवी मुकुंदराज सभागृह, अंबाजोगाई येथे प्रख्यात साहित्यिक व गांधीवादी विचारवंत प्राचार्य डॉ . विश्वास पाटील, शहादा यांच्या हस्ते व ज्येष्ठ पत्रकार अशोक देशमुख, बीड यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात येईल. अशीही माहिती दगडू लोमटे यांनी दिली. या कार्यक्रमास सर्वां नागरिक यांनी उपस्थित राहावे असे आवाहन, समितीचे सचिव दगडू लोमटे, उपाध्यक्ष डॉ. कमलाकर कांबळे, सहसचिव प्रा. सुधीर वैद्य, कोषाध्यक्ष सतीश लोमटे, सदस्य सर्वश्री डॉ. प्रकाश प्रयाग, प्रा. भगवान शिंदे, प्रा. शर्मिष्ठा लोमटे, त्र्यंबक पोखरकर आणि राजपाल लोमटे यांनी केले आहे.

---

# पारनेर शहर पाणीटंचाईसह चारा, वीजपश्नी आ. दातेंचा पाठपुरावा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** जिल्ह्यातील संभाव्य टंचाईच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथे शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर २०२६ रोजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली टंचाई आढावा बैठक पार पडली. या बैठकीत पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांनी पारनेर शहराच्या पाणीपुरवठ्यासह शेतकऱ्यांच्या चारा व वीज प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.

पारनेर शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रमुख उद्भव असलेला हंगा तलाव सध्या कोरडा पडला असल्याने आगामी काळात शहरावर पाणीटंचाईचे संकट निर्माण होण्याची शक्यता आहे. शहराची लोकसंख्या लक्षात घेता टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची वेळ आल्यास केवळ पारनेर शहरासाठी दररोज ६० ते ६५ टँकर खेपा कराव्या लागतील, अशी वस्तुस्थिती आ. दाते सरांनी बैठकीत मांडली. टंचाईच्या काळात पाणीपुरवठ्यासाठी वापरला जाणारा कोहकडी येथील जलस्रोत पारनेर शहरापासून सुमारे ३५ किलोमीटर अंतरावर असल्याने तेथून टँकर भरण्यास मोठ्या प्रमाणात वेळ व आर्थिक खर्च होणार आहे. त्यामुळे वेळ व आर्थिक बचत लक्षात घेऊन कोहकडीऐवजी एमआयडीसीच्या उद्भवातून पारनेर शहरासाठी टँकर भरण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी त्यांनी केली. आ. दाते सरांच्या मागणीची पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी सकारात्मक दखल घेत संबंधित यंत्रणेला उद्भव बदलण्याबाबत पुढील आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. त्यामुळे आगामी टंचाईच्या काळात पारनेर शहराच्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न काही प्रमाणात सुकर होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

> **मतदारसंघात निर्माण होणाऱ्या संभाव्य टंचाईच्या परिस्थितीवर प्रशासनाच्या माध्यमातून आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यासाठी माझा सातत्याने पाठपुरावा सुरु आहे. पिण्याच्या पाण्यासह जनावरांचा चारा आणि शेतकऱ्यांच्या वीजपुरवठ्याचा प्रश्नही गांभीर्याने घेतला असून, कोणत्याही परिस्थितीत सर्वसामान्य जनता व शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले जाणार नाही. टंचाईच्या काळात प्रत्येक गावाच्या गरजेनुसार पाणी उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाशी समन्वय साधून तातडीने उपाययोजना केल्या जातील. संकटाच्या काळात मी आपल्या सोबत खंबीरपणे उभा आहे.**
>
> **- आमदार काशिनाथ दाते सर**
> **(पारनेर-नगर विधानसभा)**

दरम्यान, पावसाने दडी मारल्याने आगामी काळात जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही गंभीर होण्याची शक्यता असल्याचे आ. दाते सरांनी निदर्शनास आणून दिले. टंचाईच्या परिस्थितीत जनावरे व शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाने ठोस निर्णय घेण्याची मागणी त्यांनी केली. यावर पालकमंत्री विखे पाटील यांनी चारा छावण्यांऐवजी जनावरांच्या संख्येनुसार शेतकऱ्यांना थेट डीबीटीच्या माध्यमातून आर्थिक मदत देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याचे सांगितले. मतदारसंघातील शेतकऱ्यांना सातत्याने वीजपुरवठ्याच्या समस्या भेडसावत असल्याचेही आ. दाते सरांनी बैठकीत स्पष्ट केले.

---

# हस्तकलेच्या तासाला बनवले गणपतीचे शेकडो मुखवटे

**पर्यावरणपूरक सजावटीचा श्री समर्थ विद्या मंदिर प्रशालेचा अभिनव उपक्रम**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत सावेडी येथील श्री समर्थ विद्यामंदिर प्रशालेच्या माध्यमिक विभागातील विद्यार्थ्यांनी हस्तकलेच्या तासाला पर्यावरणपूरक साहित्यापासून गणपतीचे शेकडो आकर्षक मुखवटे तयार केले.

विषयशिक्षक डॉ. अमोल बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या उपक्रमात विद्यार्थ्यांनी कागद, पुठ्ठा, दोरा, वापरातील खोकी, लाकूड आदी पर्यावरणात सहज विघटन होणाऱ्या साहित्याचा कल्पकतेने वापर केला. विविध आकार, रंग आणि कलात्मकतेचा वापर करून विद्यार्थ्यांनी गणपतीचे आकर्षक मुखवटे साकारले. गणेशोत्सवात सजावटीसाठी बाजारातील प्लास्टिक अथवा पर्यावरणास घातक साहित्याचा वापर टाळून 'कचऱ्यातून कला आणि कलेतून पर्यावरण संवर्धन' हा संदेश विद्यार्थ्यांनी या उपक्रमातून दिला आहे. सोमवारपासून सुरू होणाऱ्या घरगुती गणेशोत्सवात विद्यार्थी स्वतः तयार केलेल्या या पर्यावरणपूरक सजावटीच्या साहित्याचा वापर करणार आहेत.

विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला चालना देतानाच पर्यावरणाबद्दलची जाणीव आणि जबाबदारी निर्माण करणाऱ्या या उपक्रमाचे मुख्याध्यापिका वसुधा जोशी व पर्यवेक्षिका शारदा होशीग,अरुण राशिनकर यांनी कौतुक केले.या उपक्रमासाठी कलाशिक्षक विवेक भारताल आणि स्वाती कु. घुले यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. भारत सरकारच्या जलशक्ती मंत्रालयाच्या स्वच्छ सर्वेक्षण,शिक्षण मंत्रालयाच्या हरित विद्यालय योजना,पर्यावरण मंत्रालयाच्या मिशन लाइफइको क्लब,माझी वसुंधरा अभियान तसेच मुख्यमंत्री स्वच्छ व सुंदर शाळा अभियान आदी पर्यावरणपूरक उपक्रमांमध्ये प्रशालेचा सक्रिय सहभाग राहावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

---

# शासकीय धान्य गोदाम की जनावरांसाठी खुले कुरण?

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पैठण–** येथील शासकीय धान्य गोदामाच्या कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. गोरगरीब नागरिकांसाठी राखून ठेवलेले धान्य गोदाम परिसरात उघड्यावर पडून असल्याचे चित्र दिसत असून, या धान्याची अक्षरशः नासाडी होत आहे. विशेष म्हणजे, गोदामाच्या प्रवेशद्वारावर 'परवानगीशिवाय आत येऊ नये' असा फलक लावण्यात आला आहे. मात्र, हा नियम माणसांसाठीच असून जनावरांसाठी गोदाम खुले असल्याचे संतापजनक चित्र पाहायला मिळत आहे. गोदाम परिसरात धान्याची योग्य प्रकारे साठवणूक न करता ते उघड्यावर ठेवण्यात आल्याने जनावरे या धान्यावर ताव मारत आहेत. त्यामुळे शासनाच्या धान्यसाठ्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता आहे. एकीकडे महाराष्ट्रातील अनेक भागांत दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, गोरगरीब नागरिकांना धान्याची गरज असताना दुसरीकडे शासकीय गोदामातील धान्याची अशाप्रकारे उधळपट्टी होत असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. शासकीय धान्याचा प्रत्येक दाणा गरजू लाभार्थ्यांसाठी महत्त्वाचा असताना गोदाम प्रशासनाकडून एवढे दुर्लक्ष कसे झाले, असा सवाल उपस्थित केला जात आहे. गोदामातील धान्य उघड्यावर का ठेवण्यात आले? जनावरांना गोदाम परिसरात प्रवेश कसा मिळतो? धान्याच्या सुरक्षेसाठी कोणती उपाययोजना करण्यात आली आहे? याची चौकशी करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे. दुष्काळाच्या छायेत असताना गोरगरिबांच्या हक्काचे धान्य जनावरांच्या घशात जात असेल, तर संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. हवे असल्यास याच बातमीची अधिक आक्रमक पहिल्या पानाची हेडलाईन आणि २-३ उपशीर्षकांसह आवृत्तीही तयार करून देऊ शकतो.

---

# ग्राहक आयोगाची सुनावणी आता व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे; अहिल्यानगरचा राज्यात पहिला मान

**अहिल्यानगर जिल्हा ग्राहक आयोगात आभासी सुनावणीचा शुभारंभ । 'फिजिकल' सुनावणी कमी होऊन भविष्यात ऑनलाइन न्यायप्रक्रियेकडे कल वाढणार – मुकेश शर्मा (अध्यक्ष, राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबई)**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** ग्राहक आयोगामध्ये वाढत्या तक्रारींचा निपटारा करण्यासाठी आभासी पद्धतीने (व्हिडिओ कॉन्फरन्स) सुनावणी प्रक्रिया ही काळाची गरज बनली आहे. वाढत्या तक्रारी आणि अपुरे मनुष्यबळ याची सांगड तंत्रज्ञानाच्या माध्यमातून सोडविता येणार आहे. अहिल्यानगर जिल्हा सर्वात मोठा असून, विविध तालुक्यांतून सुनावणीसाठी येणे पक्षकार व वकिलांना काही वेळा शक्य होत नाही. अशा परिस्थितीत व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे सुनावणी शक्य होणार आहे. भविष्यात हळूहळू फिजिकल सुनावणी कमी होऊन ऑनलाइन सुनावणीकडे सर्वांचा कल राहणार असल्याचे प्रतिपादन राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबईचे अध्यक्ष मुकेश व्ही. शर्मा यांनी केले.

ग्राहकांच्या तक्रारींच्या सुनावणीची प्रक्रिया अधिक सुलभ, गतिमान आणि आधुनिक करण्याच्या दृष्टीने अहमदनगर जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगामध्ये आभासी पद्धतीने (व्हिडिओ कॉन्फरन्स) सुनावणी सेवेचा शुभारंभ राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग, मुंबईचे अध्यक्ष मुकेश व्ही. शर्मा यांच्या हस्ते करण्यात आला. टीव्ही सेंटर येथील प्रशासकीय इमारतीतील ग्राहक आयोगाच्या कार्यालयात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग (मुंबई) सदस्या पूनम महर्षी, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगचे अध्यक्ष सादिक अली बशीर सय्यद, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग सदस्या चारू डोंगरे, संध्या कसबे, रजिस्ट्रार कविता कोमार, ग्राहक तक्रार निवारण आयोग वकील संघाचे अध्यक्ष ॲड. सुनील मुंदडा आदींसह वकील बांधव व ग्राहक वर्ग उपस्थित होते.



पुढे बोलताना मुकेश व्ही. शर्मा म्हणाले की, महाराष्ट्रातील जिल्हास्तरावरील ग्राहक आयोगामध्ये सर्वात प्रथम आभासी पद्धतीने (व्हिडिओ कॉन्फरन्स) सुनावणी प्रक्रिया घेण्याचा मान अहिल्यानगरला मिळाला आहे. अशा पद्धतीने राज्यातील १० जिल्ह्यांमध्ये ही सुविधा सुरू करण्याचा मानस आहे. मात्र, या नियोजनापूर्वीच अहिल्यानगर जिल्हा ग्राहक आयोगाने स्वतःहून पुढाकार घेतला. मुंबई बेंचप्रमाणे येथे सेटअप करण्यात आल्याचे त्यांनी विशेष कौतुक केले.

प्रास्ताविकात ग्राहक तक्रार निवारण आयोग वकील संघाचे अध्यक्ष ॲड. सुनील मुंदडा म्हणाले की, अहमदनगर जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने व्हिडिओ कॉन्फरन्स सुनावणीद्वारे राज्यात एक वेगळा ठसा उमटविला आहे. शोषित, पीडित ग्राहकांच्या समस्या सोडविणे हेच ध्येय ठेवून कार्य सुरू आहे. कमीत कमी खर्चात आणि जलद स्वरूपात ग्राहकांना न्याय देण्यासाठी ही यंत्रणा उपयुक्त ठरणार आहे.

जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग सदस्या चारू डोंगरे म्हणाल्या की, सहकारी वर्ग आणि सर्व वकिलांच्या सहकार्याने जिल्हा ग्राहक आयोगामध्ये उत्तमपणे कार्य सुरू आहे. ज्येष्ठ वकील आणि पक्षकारांना सुनावणीसाठी लांबून येणे शक्य होत नाही. यासाठी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगचे अध्यक्ष सादिक अली बशीर सय्यद यांनी पुढाकार घेऊन व्हिडिओ कॉन्फरन्स सुनावणीसाठी महत्त्वाचे योगदान दिले असून, ही सुविधा कार्यान्वित केली आहे. याचा सर्वाधिक लाभ ग्रामीण भागाला होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग (मुंबई) सदस्या पूनम महर्षी म्हणाल्या की, खेड्यापाड्यांपर्यंत न्यायव्यवस्था पोहोचविण्यासाठी हा महत्त्वाकांक्षी उपक्रम ठरणार आहे. वेळ महत्त्वाचा असून, सर्वांना लांबून वेळेत हजेरी लावता येत नाही. लांब असलेले, येणे शक्य नसलेले, आजारी असलेले तसेच विविध कारणांमुळे सुनावणीसाठी उपस्थित राहू न शकणाऱ्या व्यक्तींना यापुढे न्यायापासून वंचित रहावे लागणार नाही. व्हिडिओ कॉन्फरन्स सुनावणीद्वारे न्यायप्रक्रियेत गतिमानता येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात ज्येष्ठ वकिलांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास शहर बार असोसिएशन उपाध्यक्ष ॲड. भाऊसाहेब घुले, सेंट्रल बार असोसिएशन अध्यक्ष ॲड. फारुख शेख, सचिव ॲड. अभिजीत देशपांडे, कौटुंबिक न्यायालय बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. शिवाजी कराळे, ॲड. रविंद्र बेद्रे, ज्येष्ठ वकील ॲड. सुरेश लगड, ॲड. अशोक बंग, ॲड. शिरीष जोशी, ॲड. शिरीष गटने, ॲड. किशोर राऊत, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग वकील संघाचे उपाध्यक्षा ॲड. गिरिजा गांधी, सदस्य ॲड. योगेश कुलकर्णी, ॲड. तांबोळी, ॲड. अरुणा राशीनकर, ॲड. सुजाता कुमार, ॲड. संदीप मुळे, ॲड. शुभ्रा तांबोळी, ॲड. भावना नय्यर-आहुजा, ॲड. अंजली सरोदे, ॲड. सिद्धार्थ वाघमारे, ॲड. आदित्य घालमे, ॲड. कैवल्य उपासनी, ॲड. रणजीत टाकते, ॲड. संदीप वाघ, ॲड. फैजान बेग, ॲड. विलास कोतकर, ॲड. नितेश बनबेरु, ॲड. हरीश कल्याणी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. शुभांगी बाबर यांनी केले, तर आभार ॲड. सिद्धांत गांधी यांनी मानले.

# शहरातील रुग्णसंख्या कमी करण्यासाठी उपाययोजना करा - आमदार संग्राम जगताप

**। एकात्मिक आरोग्यवर्धिनी समितीची पहिली सभा आमदार संग्राम जगताप यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न**
**। मनपा आरोग्य समितीच्या अध्यक्षपदी डॉ. सागर बोरुडे, सह अध्यक्षपदी दत्ता गाडळकर.**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–**अहिल्यानगर शहरातील नागरिकांचे आरोग्य सदृढ व निरोगी राहणे गरजेचे असून, शहराच्या विकासकामांबरोबरच नागरिकांचे आरोग्यही तितकेच महत्त्वाचे आहे. शहरातील रुग्णसंख्या वाढण्यापेक्षा ती कमी करण्यासाठी महापालिका आरोग्य विभागाने विविध उपाययोजना राबवाव्यात. शासनाच्या माध्यमातून आरोग्याच्या विविध सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. या सुविधा शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचे काम सर्वांनी मिळून करावे, असे प्रतिपादन एकात्मिक आरोग्यवर्धिनी समितीचे अध्यक्ष आमदार संग्राम जगताप यांनी केले.

अहिल्यानगर महानगरपालिका विधानसभा मतदारसंघातील एकात्मिक आरोग्यवर्धिनी समितीची पहिली सभा आमदार संग्राम जगताप यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी महापौर ज्योतीताई गाडे, आयुक्त यशवंत डांगे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, स्थायी समिती सभापती पैलवान सुभाष लोंढे, सिव्हिल सर्जन संजय घोगरे, मनपा महिला व बालकल्याण समिती सभापती दिपालीताई बारस्कर, उपसभापती वर्षाताई सानप, मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, नगरसेवक कुमार सिंह वाकळे, मनपा आरोग्य समितीचे अध्यक्ष नगरसेवक डॉ. सागर बोरुडे सह अध्यक्ष, नगरसेवक दत्ता गाडळकर, नगरसेवकनिखिल वारे, सुरेश बनसोडे, प्रकाश भागानगरे, मयूर बांगरे, महेश तवले, बाळासाहेब पवार, पुष्कर कुलकर्णी, मोहित पंजाबी, विजय पठारे, करण कराळे, संजय ढोणे, रोहन सानप, महेश लोंढे, आकाश कातोरे, सुमित लोंढे, सुजय मोहिते, जितू गंभीर तसेच नगरसेविका रोशनी त्रिंबके, सोनाबाई शिंदे, वंदना ताठे आदी सदस्य, डॉक्टर, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मनपा आरोग्य समितीच्या अध्यक्षपदी नगरसेवक डॉ. सागर बोरुडे, तर सह अध्यक्षपदी नगरसेवक दत्ता गाडळकर यांची निवड करण्यात आली.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, महापालिकेने सुरू केलेले 'डेंग्यूमुक्त अहिल्यानगर' अभियान कौतुकास्पद असून, या माध्यमातून नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात जनजागृती होत आहे. याच पद्धतीने स्वच्छता मोहीम आणि आरोग्यविषयक जनजागृती नागरिकांमध्ये करण्यात यावी.

शासनाच्या विविध योजना उपलब्ध असल्या तरी त्याची माहिती सर्वसामान्य नागरिकांना नसते. देशात विविध कायदे मंजूर होतात; मात्र त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी किती होते, यासाठी लोकसहभागाची खरी गरज आहे. नागरिकांच्या सोयीनुसार आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

महापालिकेच्या मोफत लॅबची वेळ सकाळच्या सत्रात ठेवावी, जेणेकरून ज्येष्ठ नागरिकांना त्याचा लाभ घेता येईल. आरोग्य विभागाचे अधिकारी-कर्मचारी काम करीत असताना समाजाबद्दलची चांगली भावना, नागरिकांशी सुसंवाद, संपर्क आणि कौटुंबिक स्नेह निर्माण करावा. या माध्यमातून आरोग्याच्या चांगल्या सुविधा नागरिकांपर्यंत सहजपणे पोहोचतील.

समाजातील आर्थिकदृष्ट्या सक्षम व्यक्ती आपल्या आरोग्यासाठी चार डॉक्टर उभे करू शकतात; मात्र सर्वसामान्य कुटुंबातील व्यक्ती आर्थिक परिस्थितीमुळे आरोग्याच्या सुविधांपासून लांब राहू शकते. त्यामुळे अशा सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्यासाठी आपण सर्वांनी काम केले पाहिजे आणि आरोग्य सुविधांचा लाभ त्यांना मिळाला पाहिजे, असे आमदार जगताप यांनी सांगितले.

शहरातील महापालिकेच्या आरोग्य केंद्रांच्या बाहेर उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सुविधांचा फलक दर्शनी भागात लावावा. त्यावर डॉक्टरांचे मोबाईल क्रमांकही नमूद करावेत, जेणेकरून नागरिकांना उपलब्ध सुविधांची माहिती सहज मिळेल.

महापालिका आरोग्य विभागाने झोन कार्यालयानुसार समित्या स्थापन करून नगरसेवकांना अध्यक्ष करावे. या समित्यांनी दर आठवड्याला आरोग्यविषयक बैठक घ्यावी. त्यानुसार प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी समन्वयाने काम करावे.

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या माध्यमातून शहरात महापालिकेच्या जिजामाता हॉस्पिटलची निर्मिती करण्यात आली आहे. हे हॉस्पिटल खासगी हॉस्पिटलच्या बरोबरीने उभे राहिले आहे. या माध्यमातून नगरकरांना आरोग्याच्या चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी योग्य नियोजन करावे.

# समर्थ विद्या मंदिरात विद्यार्थ्यांनी साकारले १५१ 'मातीचे बाप्पा'

**श्लोक ,आरत्या,गणपतीची गाणी म्हणत रंगली कार्यशाळा**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सावेडी येथील समर्थ विद्या मंदिर शाळेत आयोजित करण्यात आलेल्या शाडूच्या मातीपासून गणेशमूर्ती बनवण्याच्या भव्य कार्यशाळेत सुमारे १५१ विद्यार्थ्यांनी श्लोक ,आरत्या, गणपतीची गाणी म्हणत प्रत्यक्ष शाडूच्या मातीपासून बाप्पाच्या मूर्ती साकारल्या.

अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे आणि समर्थ विद्या प्रसारक मंडळाचे सचिव सुरेश क्षीरसागर,शालेय समिती चेअरमन ॲड किशोर देशपांडे यांच्या विशेष पुढाकारातून हा उपक्रम संपन्न झाला.याप्रसंगी प्राचार्या वसुधा जोशी, पर्यवेक्षिका शारदा होशिंग, पर्यावरणदूत डॉ.अमोल बागुल, कलाशिक्षक विवेक भारताल, अरुण राशिनकर,सुनील रायकर आदींनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

आयुक्त यशवंत डांगे यांनी नमूद केले की,
दिव्य मराठीचा हा उपक्रम स्तुत्य आहे यामुळे विद्यार्थ्यांना पर्यावरण पूरक जगण्याची सवय लागणार आहे महानगरपालिकेच्या माध्यमातून देखील शाळा शाळांमधून अशा प्रकारची उपक्रम आम्ही राबवत आहोत.

संस्थेचे सचिव सुरेश क्षिरसागर म्हणाले की जागतिक तापमान वाढ होत असताना या उपक्रमातून एक चांगला पर्यावरणीय संस्कार शेकडो मुलांना मिळाला आहे.

ॲड.देशपांडे यांनी प्रतिपादन केले की पर्यावरण शिक्षक आवश्यक आणि काळाची गरज बनलेली असू या उपक्रमातून विद्यार्थ्यांना निसर्ग रक्षणाचे धडे मिळणार आहेत.

विद्यार्थ्यांनी शाडू मूर्ती पासून गणपती बनवताना कागद, काड्या, झाडांची पाने, पुठ्ठा ,माती अशा पर्यावरण पूरक साहित्याचा वापर केला होता. कार्यशाळा झाल्यानंतर झालेला पर्यावरण पूरक कचरा विद्यार्थी व शिक्षकांनी स्वतः स्वच्छता करून हा कचरा कंपोस्ट खत निर्मितीसाठी जमा केले.

# सेंटविवेकानंद इंग्लिश स्कूलमध्ये राष्ट्रभाषा हिंदी सप्ताह उत्साहात संपन्न




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूल, अहिल्यानगर येथे हिंदी दिवसाच्या निमित्ताने हिंदी सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. या सप्ताहा दरम्यान विद्यार्थ्यांसाठी हिंदी भाषेचे महत्त्व, हिंदी साहित्याचा समृद्ध इतिहास तसेच हिंदी भाषेतील विविध साहित्यिक प्रवाह यांची ओळख करून देणारे विविध उपक्रम घेण्यात आले.

हिंदी सप्ताहामध्ये हिंदी साहित्य इतिहास, प्रसिद्ध साहित्यिक व कवींचे जीवनकार्य, म्हणी-वाक्प्रचार, चित्रपटांची नावे पूर्ण करणे, शब्दखेळ, काव्यवाचन, वक्तृत्व, निबंधलेखन, प्रश्नमंजुषा अशा विविध मनोरंजक व ज्ञानवर्धक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या कलागुणांचे सुंदर प्रदर्शन केले.

हिंदी दिवस कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून प्रगत महाविद्यालयाचे प्राचार्य तसेच मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद अध्यक्ष , भारत सरकार आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त आदरणीय श्री. सुनील पंडित सर उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना हिंदी भाषेचे महत्त्व सांगून हिंदी साहित्याची परंपरा, साहित्यिकांचे योगदान आणि मातृभाषेबरोबरच राष्ट्रभाषेच्या संवर्धनाची गरज याविषयी मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रेरणादायी विचारांमुळे विद्यार्थ्यांमध्ये हिंदी भाषेविषयी अधिक आवड व अभिमान निर्माण झाला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्या गीता तांबे मॅडम, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका कांचन पापडेजा मॅडम, हिंदी विभागप्रमुख सुमन कदम, वैशाली शिंदे मॅडम तसेच सर्व शिक्षकवृंद यांनी विशेष परिश्रम घेतले. हिंदी दिनाच्या निमित्ताने हिंदी सप्ताह आयोजनामध्ये शाळेच्या प्राचार्य गीता तांबे मॅडम यांनी हिंदी भाषेला महत्त्वाचे स्थान असून हिंदी भाषा चा उपयोग जगभर होत आहे व हिंदी भाषेचा प्रचार प्रसार व्हावा यासाठी मार्गदर्शन केले.

हिंदी सप्ताहाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ''हिंदी भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून समृद्ध साहित्य, संस्कृती आणि भावविश्वाची ओळख करून देणारी भाषा आहे याची जाणीव झाली. हिंदी दिवसाच्या औचित्य साधून विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.निबंध स्पर्धा व हिंदी विषयात विशेष कामगिरी करणाऱ्या विद्यार्थीना सन्मानित करणयात आले व विशेष कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांना प्रशस्ति पत्रक व बक्षिसांचे वितरण करण्यात आले .संस्थेचे खजिनदार श्री दामोदर माखिजा सर यांनी सर्वांना हिंदी दिन सप्ताहाच्या शुभेच्छा देऊन हिंदी भाषेचे महत्त्व पटवून दिले .विविध उपक्रमांमुळे शाळेच्या परिसरात हिंदीमय वातावरण निर्माण झाले आणि हिंदी साहित्याच्या इतिहासाला नव्याने उजाळा मिळाला.

# विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवणे गरजेचे : जादूगार प्रकाश शिरोळे

**ढोकेश्वर विद्यालयात आनंददायी शनिवार निमित्त रंगले जादूचे प्रयोग**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**टाकळीढोकेश्वर–** जादू म्हणजे कौशल्य, हातचलाखी व विज्ञान होय आणि भोंदूगिरी म्हणजे त्या कौशल्याचा किंवा अज्ञानाचा गैरवापर. जादूगार स्पष्टपणे मनोरंजनासाठी प्रयोग करतो आणि तो स्वतःला देव किंवा चमत्कारी शक्तीचा मालक असल्याचे सांगत नाही. मात्र भोंदू बाबा अशाच प्रकारच्या प्रयोगांना दैवी शक्ती, चमत्कार किंवा उपचार म्हणून सादर करून लोकांकडून पैसा, मान - सन्मान किंवा अनुयायी मिळवण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे समाजाने अशा भोंदू बाबांपासून दूर राहिले पाहिजे आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांना या जादूच्या प्रयोगमागील वैज्ञानिक दृष्टिकोन समजावला पाहिजे असे प्रतिपादन महाराष्ट्रातील प्रसिद्ध जादूगार प्रकाश शिरोळे यांनी केले.

पारनेर तालुक्यातील अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्था संचालित श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आनंददायी शनिवार निमित्त जादूचे प्रयोग आयोजित करण्यात आले होते. त्या प्रसंगी प्रकाशजी शिरोळे यांनीजादूचे प्रयोग करता करता विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. इयत्ता ५ वी ते १२ वी च्या जवळपास १३०० विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचा आनंद घेतला. काही विद्यार्थी स्वतः या प्रयोगामध्ये सहभागी झाले. कार्यक्रम पाहून विद्यार्थी आनंदी झाले.

**तक्रारदार विद्यमान संचालक विविध कार्यकारी सेवा सोसायटी खडकवाडी सखाराम शंकर नवले यांची प्रतिक्रिया ''सभासदत्व मिळण्याच्या पात्रतेच्या वेळी संबंधित सभासदाच्या नावावर आवश्यक जमीन नसल्याचा आमचा आक्षेप होता. त्यावर आता सहाय्यक निबंधकांनी सभासदत्व रद्द करण्याचा आदेश दिला आहे. अखेर सत्याचा विजय झालेला आहे.**

या प्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब खिलारी, पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे, शास्त्र समन्वयक अशोक गांगड, कला समन्वयक राजेंद्र ढोणे, भांडार प्रमुख प्रा. देविदास आठरे, परीक्षा प्रमुख बाबासाहेब जाधव, प्रसिद्ध चित्रपट गीतकार अरुण वाळुंज, रवींद्र मते, अतुल सैद, श्रीरंग धामणे, संदीप महांडुळे, नारायण शेळके, कल्पना जाधव, सुमन वाळुंज, प्रिया डव्हणे,सुरेखा ठाणगे, सोनल रोहकले, संदीप खिलारी, मिनाक्षी पवार, विष्णू भद्रे, निलेश पाचर्णे, सोनाली माळवदे, योगेश मांडगे, आतिष झावरे, सचिन महानवर, पोपट जगदाळे, सुनील झावरे, मिनाक्षी खाडे, सिमा खोसे, नितीन ढोकळे, मंगेश पोपळघट, रामदास नरवडे, सिमा खोसे, रुपाली घोलप, अनिकेत बांगर, सुवर्णा दिघे, पवन कुटे, शिरीष राऊत, अनुष्का कांबळे, भाऊसाहेब बांबेरे, नारायण हरेल, अमोल गोरे, सुनिता घोडके इत्यादी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.
कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अतुल सैद यांनी केले तर आभार पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे यांनी मानले.

(पान १ वरून)

## भगवान महावीरांचे अहिंसेचे तत्वज्ञान मनमनात रूजावे - अमृता फडणवीस

सदस्य, समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी, चातुर्मास भोजन कमिटीचे संतोष पिपाडा, संजय ताथेड, नितीन चंगेडिया, किरण राका, सुधीर मुनोत, राजकुमार शेटिया, महेश गुगळे, आशिष खंडेलवाल, राहुल गांधी, चेतन गुगळे, गिरीष पटवा, राजेश बोरा, अमित मुथा, अमर बोरा, सचिन बोरा, किशोर डागा, मनिष मुंदडा, विनोद कटारिया, चातुर्मास कमिटी लेडीज विंगच्या प्रीतम राका, शैला ताथेड, नीता पिपाडा, भारती पोखरणा, प्रियांका चंगेडिया आदी उपस्थित होते. समर्पण चातुर्मास कमिटीच्या लेडीज विंगने अमृता फडणवीस, धनश्री विखे पाटील यांचे स्वागत व सत्कार केला. चातुर्मास कमिटीने आ. संग्राम जगताप, अनिल मोहिते यांचा सत्कार केला.

पूज्य प्रविणऋषीजी महाराज म्हणाले, इतर सर्व सण उत्सवात भरपेट जेवण केले जाते. पण पर्युषण पर्व हा संयमाचा उत्सव आहे. यात जप तप आणि उपवास केले जातात. येथे आज लहान मुलेही अट्ठाई उपवास करत आहेत. आत्मपरीक्षण करण्याचा हा उत्सव आहे. यात क्षमा, अहिंसा आणि मैत्रीची शिकवण असते. गुरूदेव आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या पुण्यस्मृतीनिमित्त महाराष्ट्र शासनाने १९९२ मध्ये लोकराज्य विशेषांक प्रकाशित केला होता. गुरूदेवांची जन्मभूमी चिचोंडी तर दीक्षा भूमी मिरी आहे आणि पुण्यभूमी अहिल्यानगर आहे. याठिकाणी त्यांनी अंतिम क्षणापर्यंत भाविकांना दर्शन, आशीर्वाद दिले. आचार्यश्रींच्या प्रेरणेने शैक्षणिक, आरोग्य क्षेत्रातही मोठे काम चालू आहे. मिरी येथील दीक्षा भूमीत शासकीय जागा मिळावी असा आग्रह असून अमृता फडणवीस यांनी ही मागणी मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहचवावी.

अमृता फडणवीस म्हणाल्या की, अतिशय पवित्र समर्पण चातुर्मास व पर्युषण पर्व काळात नगरमध्ये येण्याचे सौभाग्य लाभले आहे. चातुर्मास केवळ धर्मासाठी नसून राष्ट्र जागृती, संस्कृती, युवा वर्गासाठी, महिला सन्मानासाठी आहे. भगवान महावीर यांनी स्वतःवर विजय मिळवण्याची शिकवण दिली. प्रत्येकाने आपल्या मनातील क्रोध, लोभ, अहंकार हे अवगुण दूर केले पाहिजे. शरीरानेच नाही तर मनानेही हिंसा होणार नाही हे अहिंसेचे हे तत्व जीवनात आचरणात आणले पाहिजे. आजच्या काळातील युद्धजन्य, अशांततेची परिस्थिती बदलायची तर भगवान महावीरांचे जगा आणि जगू द्या हे तत्वज्ञान मनमनात रूजले पाहिजे. आताचे युग स्पर्धेचे आहे, धावपळीचे आहे. पण हे करताना आपले मूळ संस्कार विसरता कामा नये. याठिकाणी आल्यानंतर खूप कमी वेळात अतिशय मोठी सकारात्मक ऊर्जा मिळाली आहे.

आमदार संग्राम जगताप म्हणाले, नगरमधील समर्पण चातुर्मासात आज अमृता फडणवीस आवर्जून उपस्थित राहिल्या आहेत. आचार्यश्रींचे समाधीस्थळ अहिल्यानगर शहरात आहे. पूज्य प्रविणऋषीजी महाराज यांच्या अहिल्यानगर येथील चातुर्मासात पुढच्या अनेक पिढ्यांना उपयुक्त ठरणारे अनमोल मार्गदर्शन मिळत आहे. चातुर्मास कमिटीने अतिशय उत्कृष्ट नियोजन केले आहे. सौरभ बोरा परिवारानेही अतिशय श्रद्धेने चातुर्मासासाठी खूप मोठे योगदान दिले आहे. जैन धर्मातील क्षमापनाचे संस्कार सगळ्यांनीच आचरणात आणल्यास भारत अधिक बलशाली होईल. सौरभ बोरा म्हणाले, आचार्य आनंदऋषीजी महाराज यांची जन्मभूमी आणि तपोभूमी असलेल्या अहिल्यानगरमध्ये उपाध्याय प्रवर पूज्य प्रविणऋषीजी महाराज यांचा १७ वर्षांनंतर समर्पण चातुर्मास होत असल्याने भाविकांमध्ये प्रचंड उत्साह आहे. देशाच्या विविध भागांतून भाविक चातुर्मास तसेच पर्युषण पर्व आराधनेसाठी नगरला आले आहेत. भारत जगातील चौथी मोठी आर्थिक शक्ती असून यात जैन समाजाचा मोठा वाटा आहे. जैन समाज धर्म कार्य, समाज कार्यातही अग्रेसर आहे. युवा पिढीला आपल्या उज्वल परंपरेशी जोडण्याचे काम या चातुर्मासात होत आहे. क्षमापना सारख्या महान पर्वाचा हिस्सा असणे सर्वांसाठी गौरवास्पद आहे.

पूज्य तिर्थेशऋषीजी महाराज यांनी उपाध्यायश्रींच्या अर्हम विज्जा कार्यक्रमाची व शिराळ चिचोंडी येथील आनंद तीर्थ प्रकल्पाची सविस्तर माहिती दिली. चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा यांनी स्वागत केले. याप्रसंगी श्रावक श्राविका मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रसाद बेडेकर यांनी केले.

## गणेशोत्सवानिमित्त शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिरात विविध कार्यक्रम

मानवंदना दिली जाईल. दि. २० सप्टेंबर रोजी सकाळी ८.३० वा महिलांचे सामुहिक अथर्वशीर्ष पठण व महाआरती होईल. दि.२२ सप्टेंबर ते २४ सप्टेंबरपर्यंत वैभव अजय बोरुडे परिवाराच्यावतीने श्री गणेशयाग होणार आहे. त्याचे पौरोहित्य नाशिक येथील मुकुंदशास्त्री मुळे गुरुजी करणार आहेत तसेच दि.१४ ते १९ सप्टेंबर पर्यंत अहिल्यानगर शहरातील विविध ढोलपथक आपली वादन कला श्री विशाल गणेश मंदिर प्रांगण येथे सादर करणार आहे .तसेच शहरातील विविध भजनी मंडळ आपला भजनसंध्या कार्यक्रम सादर करणार आहे . दि.२५ सप्टेंबर रोजी गणेश विसर्जन दिनी सकाळी ८.३० वा. जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया व सौ.आशिया यांच्या हस्ते उत्थापन पुजा करण्यात येऊन मिरवणुकीस प्रारंभ करण्यात येईल. या मिरवणुकीमध्ये सुरुवातीस सनई चौघडा, युगंधर व रुद्रनाद हे दोन ढोलपथक वादन करणार आहेत.

यावेळी ॲड.अभय आगरकर म्हणाले, गणेशोत्सवानिमित्त १२ दिवसात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. भविकांच्या सोयी-सुविधांसाठी मंडप, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे तसेच यावेळी अभिषेक हॉल चे काम सुद्धा अंतिम टप्प्यात असल्याचेही ॲड.आगरकर यांनी सांगितले. गणेशोत्सव यशस्वीतेसाठी देवस्थानचे महंत संगमनाथ महाराज, उपाध्यक्ष पंडितराव खरपुडे, सचिव अशोकराव कानडे, विश्वस्त पांडूरंग नन्नवरे, रंगनाथ फुलसौंदर, बापुसाहेब एकाडे, चंद्रकांत फुलारी, विजय कोथिंबिरे, हरीचंद्र गिरमे, ज्ञानेश्वर रासकर, प्रा.माणिक विधाते, संजय चाफे, नितिन पुंड आदिंसह श्री विशाल गणेश सेवा मंडळ व भक्तगण प्रयत्नशील आहेत.

## जमीन नसल्याने खडकवाडी सोसायटीतील सभासदत्व रद्द

त्यामुळे तक्रार अर्ज दाखल झालेल्या दिवशी त्यांच्या नावावर आवश्यक जमीन नसल्याची वस्तुस्थिती बदलत नसल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम २५(३) मधील तरतुदीनुसार श्री. शरद भाऊसाहेब गागरे यांचे खडकवाडी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेतील सभासदत्व रद्द करण्याचा आदेश सहाय्यक निबंधकांनी दिला आहे. तसेच संबंधित व्यक्तीकडे संस्थेचे कर्ज असल्यास संपूर्ण कर्जवसुलीची जबाबदारी संस्थेचे संचालक मंडळ व सचिव यांच्यावर राहील, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे. आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करून त्याचा अहवाल कार्यालयास सादर करण्याचे निर्देश संस्थेला देण्यात आले आहेत